सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ९६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २२ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## पुण्यात पावसाचा हाहाकार! रस्ते पाण्याखाली, वाहनं बुडाली

### नजर फिरवेल तिकडे पाणीच पाणी, विदर्भात मात्र उष्णतेचा रेड अलर्ट



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि,२२पुणे –** पुण्याला मान्सून पूर्व पावसाने झोडपून काढले. या पावसामुळे पुण्यातील रस्त्यांना नदीचे स्वरूप आले आहे. पुण्यात कोंढवा परिसरात मुसळधार पाऊस पडत आहे. पहिल्याच पावसामुळे पुणे जलमय झालं. पुण्यातील हडपसर परिसरामध्ये असणाऱ्या वाडकर मळ्यात रस्त्याला नदीचे स्वरूप आले आहे. रस्त्यावर पाणीच पाणी झाले आहे. प्रशासनाच्या गलथान कारभाराचा पुणेकरांना फटका बसल्याचा आरोप शिवसेना शहरप्रमुख नाना भानगिरे यांनी केला आहे. मुळशी तालुक्यात आज दुपारी ३ वाजल्यापासून जोरदार पाऊस पडत आहे. याठिकाणी ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडत आहे. या पावसामुळे उकाड्याने हैराण झालेल्या पुणेकरांना दिलासा मिळाला.तर विदर्भाला मात्र हवामान खात्याने उष्णतेचा रेड अलर्ट दिला आहे.

काही दिवसांपासून पुणे शहरात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेल्याचे आपल्याला पाहायला मिळालं होतं. आज सकाळपासून पुणे शहरात ढगाळ वातावरण होते. दुपारी पुणे शहरात मुसळधार पावसाला सुरुवात झाली. पुणे शहरातील उपनगर तसेच मध्यवर्ती भागात पावसाच्या सरी बरसू लागल्या. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार पुढील २ दिवस पुणे शहरात पावसाची शक्यता आहे. अचानक आलेल्या पावसामुळे निश्चित काही पुणेकरांची तारांबळ उडाली असली तरी सुद्धा उकाडापासून पुणेकरांना नक्कीच या पावसाने दिलासा दिला आहे.

### विदर्भाला रेड अलर्ट –

नागपूरसह संपूर्ण विदर्भाला उष्णतेचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. नागपूरचे हवामान तज्ज्ञ प्रवीण कुमार यांनी सांगितले की, नागपूरसह विदर्भात तापमान वाढले आहे. अकोला अमरावती आणि पूर्व विदर्भातील वर्धा चंद्रपूर हे हिटव्हेव प्रभाव जाणवत आहे. पुढील ५ ते ६ दिवस तापमान वाढल्याची शक्यता आहे. काही जिल्ह्यांना रेड अलर्ट तर काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. अकोला यवतमाळ अमरावती, वर्धा, या जिल्ह्यांना रेड अलर्ट देण्यात आला आहे.

## आरक्षण द्या, फडणवीसांची मिरवणूक काढू

### अंतरवालीत मनोज जरांगे-प्रसाद लाड यांच्यात चर्चा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२वडीगोद्री**
भाजप नेते प्रसाद लाड हे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांच्या माध्यमातून आले आहेत. त्यांच्या आत्मीयतेवर आणि आत्मविश्वासावर आम्ही विश्वास ठेवला आहे. त्यांच्या मध्यस्थीने गोरगरीब मराठ्यांना १०० टक्के न्याय मिळेल आणि मागण्या पूर्ण होतील, अशी आम्हाला पूर्ण अपेक्षा आहे, अशी भावना मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केली. जरांगे पाटील यांनी ३० मे रोजी आंदोलन करण्याचे जाहीर केले आहे. या पार्श्वभूमीवर प्रसाद लाड अंतरवाली सराटीत येण्यापूर्वी जरांगे यांनी पत्रकारांशी सविस्तर संवाद साधला.मनोज जरांगे पाटील यांनी भाजपचे नेते प्रसाद लाड यांच्याशी चर्चा करताना सरकारपुढे पुन्हा एकदा रोखठोक प्रश्न उपस्थित केले. ओबीसी आरक्षणासाठी नेमका काय निकष लावला? आम्ही तीन वेळा मागास सिद्ध करूनही आम्हाला आरक्षण का नाही? शिंदे समितीने शोधलेल्या ५८ लाख कुणबी नोंदींचे काय झाले? हैदराबादचा जीआर काढला, पण प्रमाणपत्र का मिळत नाही? असे सवाल त्यांनी केले. पुढे बोलताना ते म्हणाले, तुम्ही मराठा समाजाचे स्वप्न मोडू नका. आरक्षण द्या, आम्ही स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भव्य मिरवणूक काढू असल्याचे जरांगे म्हणाले.

### ३० मे चे उपोषण मागे घ्या – प्रसाद लाड

आमच्या मराठा समाजात मनोज दादा आमचे खरे हिरो आहेत. मी येथे कोणतीही राजकीय भूमिका घेऊन आलेलो नाही, तर मी स्वतः मराठा समाजाचा एक घटक आणि प्रसाद लाड म्हणून आलो आहे. मी दादांच्या तब्येतीची विचारपूस केली आहे. समाजात निर्माण झालेला संभ्रम दूर करून अडलेले विषय मला पुढे घेऊन जायचे आहेत. मराठा समाजाला आता इथून पुढे आंदोलन करण्याची गरज पडणार नाही, त्यामुळे दादांनी ३० मे रोजी पुकारलेले पुढील उपोषण मागे घ्यावे, अशी मी विनंती केली आहे.

**– प्रसाद लाड, भाजप नेते.**

## आमदार रवि राणांची काँग्रेस नेत्यांसोबत 'मसलत'

### भाजपमध्ये पुन्हा 'पाडापाडी'ची भीती



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**
स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीची घोषणा होताच जिल्ह्याच्या राजकारणात अत्यंत नाट्यमय आणि छुप्या घडामोडींना वेग आला आहे. मनपा आणि नगरपरिषद निवडणुकांमध्ये भाजपचा त्यांच्याच सत्तेतील 'मित्राकडून' घात झाला होता, हे निकालाअंती स्पष्ट झाले होते. आता नेमकी तीच भीती भाजपच्या गोटात पुन्हा निर्माण झाली आहे.

आमदार रवि राणा यांनी बंधू सुनील राणा यांच्या विजयासाठी थेट महाविकास आघाडीच्या गोटात गुप्त 'फिल्डिंग' लावल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात आहे. राणा यांनी चक्क काँग्रेसच्या बड्या नेत्यांशी सलगी वाढविली आहे.

महापालिका निवडणुकीत आ. रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाने भाजपच्या अनेक दिग्गजांना पराभूत करण्याची किमया केली होती. अनेक महत्त्वाच्या प्रभागांमध्ये भाजप आणि 'वायएसपी' एकमेकांसमोर थेट शड्डू ठोकून लढले होते. पाडापाडीच्या राजकारणाचा फटका बसल्यामुळेच भाजपला अवघ्या २५ जागांवर समाधान मानावे लागले होते, तर युवा स्वाभिमानने मोठी झेप घेत १५ जागांवर विजय मिळविला होता. जरी सध्या महापालिकेत महायुतीची सत्ता असली आणि त्यात 'वायएसपी' सह अजित पवार गट सोबत असला, तरी निवडणुकीतील त्या दगाफटक्याची सल भाजप नेत्यांच्या मनात कायम आहे.

अमरावती लोकल बॉडी निवडणुकीत महायुतीची उमेदवारी प्रवीण पोटे पाटील यांनाच दिली जाईल, असे संकेत पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दोन ते तीन जाहीर कार्यक्रमातून दिले आहेत. दोन टर्मची आमदारकी, राज्यमंत्रीपद, संघटनेवर मजबूत पकड या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत. यापूर्वीची निवडणूक त्यांनी एकहाती जिंकली होती. तर दुसरीकडे भाजपच्या शिर्षस्थ नेतृत्वासोबतही त्यांची सलगी आहे. त्यामुळे पोटे पाटील यांना ही तिसऱ्यांदा महायुतीची उमेदवारी मिळू शकते, असे बोलले जात आहे.

## राज्यात अकरावी प्रवेशासाठी केवळ ९.५७ लाख विद्यार्थ्यांची नोंदणी

### २० लाख ३० हजार ३३३ जागा उपलब्ध

**शून्य फेरीमध्ये कोटाअंतर्गत विभागनिहाय झालेले प्रवेश**

| विभागाचे नाव : | इन-हाऊस कोटा : | व्यवस्थापन कोटा : | अल्पसंख्यांक कोटा : | एकूण प्रवेशित विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| पुणे : | ५,८२६ : | १,११५ : | १,५८५ : | ८,५२६ |
| मुंबई : | २,६९० : | १७६ : | ४,१८२ : | ७०४८ |
| नाशिक : | ३,१६६ : | ५३८ : | २,२९९ : | ६,००३ |
| अमरावती : | २,१४४ : | ५०३ : | १,९५८ : | ४,६०५ |
| कोल्हापूर : | २,७२१ : | ८३४ : | ६१४ : | ४,१६९ |
| छत्रपती संभाजीनगर : | १,७१९ : | ५२२ : | १,७११ : | ३,९५२ |
| नागपूर : | २,२५५ : | ५३७ : | ४७७ : | ३,२६९ |
| लातूर : | १,२१७ : | ५१३ : | ३११ : | २,०४१ |
| एकूण : | २१,७३८ : | ४,७३८ : | १३,१३७ : | ३९,६१३ |



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२ पुणे–** राज्यात अकरावी प्रवेशाच्या केंद्रीय व ऑनलाइन प्रक्रियेत एकूण २० लाख ३० हजार ३३३ जागा उपलब्ध असून, आतापर्यंत केवळ ९ लाख ५४ हजार ८६७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. तसेच शून्य फेरीत दि. १८ व १९ मे २०२६ दरम्यान एकूण ३९ हजार ६१३ विद्यार्थ्यांनी कोटातंर्गत (इन-हाऊस, व्यवस्थापन, अल्पसंख्याक) प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित केला आहे. माध्यमिक व उच्चच माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी ही माहिती परिपत्रकाद्वारे दिली आहे.

दरम्यान, राज्यात शून्य फेरीसाठी एकूण ९ हजार २६३ कनिष्ठ महाविद्यालय/उच्च माध्यमिक शाळांची नोंदणी करण्यात आलेली आहे. ज्या विद्यार्थ्यांनी शून्य फेरीमध्ये कोटाअंतर्गत आपला प्रवेश निश्चित केलेल्या आहे, त्यांची नावे पुढील प्रवेश फेऱ्यांमधून वगळण्यात येतील. विद्यार्थी-पालक, तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन देखील करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी शिक्षण विभागाने https://mahafyjcadmissions.in हे अधिकृत पोर्टल आणि supportmahafyjcadmissions.in हा ई-मेल आयडी देण्यात आला आहे. तसेच ८५३०९५५५६४ हा हेल्पलाइन नंबर देखील प्रसिद्ध करण्यात आले आहे.

## नीट पेपरफुटी प्रकरण: महाराष्ट्र, राजस्थानमध्ये प्रिंट काढून विक्री

### हायप्रोफाइल पालक सीबीआयच्या रडारवर




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २२लातूर** वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभाग म्हणजेच सीबीआयने तपासाचा वेग प्रचंड वाढवला आहे. या प्रकरणात आतापर्यंत अनेकांना बेड्या ठोकण्यात आल्या असून, सीबीआयच्या हाती लागलेल्या नव्या पुराव्यांमुळे देशभरात खळबळ उडाली आहे. या प्रश्नपत्रिकेची थेट महाराष्ट्र आणि राजस्थानमध्ये प्रिंट काढून विक्री करण्यात आल्याचे ठोस पुरावे सीबीआयच्या हाती लागले आहेत. विशेष म्हणजे, या संपूर्ण पेपरफुटी प्रकरणाचा मुख्य केंद्रबिंदू महाराष्ट्र ठरल्याचे समोर येत अनेक हायप्रोफाइल पालक सीबीआयच्या रडारवर आहेत. या प्रकरणाची पाळेमुळे अत्यंत खोलवर रुजलेली असून आगामी काळात या तपासाला अधिक व्यापक वळण मिळण्याची शक्यता आहे. प्राथमिक तपासानुसार, महाराष्ट्रातूनच हा पेपर फोडला गेला आणि त्याचे जाळे इतर राज्यांपर्यंत पसरले. काही अत्यंत हायप्रोफाइल पालक आणि त्यांच्या नातेवाईकांनी आपल्या मुलांसाठी पैशांनी हा पेपर विकत घेतल्याची धक्कादायक माहिती समोर आली. दरम्यान, पी व्ही कुलकर्णी आणि मनीषा वाघमारे यांच्या बँक खात्यांचे व्यवहार तपासले जात आहेत. ज्या पालकांनी या दोघांच्या बँक खात्यात पैसे ट्रान्सफर केले आहेत, त्यांची यादी सीबीआयने तयार केली आहे. या सर्व हायप्रोफाइल पालकांची कसून चौकशी केली जाणार आहे.महाराष्ट्र आणि राजस्थानमध्ये पेपरच्या प्रिंट्स काढून ज्या पद्धतीने बेकायदेशीरपणे त्याची विक्री झाली, त्यावरून हे मोठे संघटित रॅकेट असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत या प्रकरणात महाराष्ट्रातून काही मोठ्या आणि हायप्रोफाइल व्यक्तींना अटक होण्याची दाट शक्यता आहे. या प्रकरणात अटक करण्यात आलेले बालरोग तज्ज्ञ डॉ. मनोज शिरुरे यांच्या संशयास्पद हालचालींमुळे या संपूर्ण प्रकरणाची व्याप्ती वाढली असून, केंद्रीय अन्वेषण विभाग आता अधिक आक्रमक मोडमध्ये आली आहे. डॉ. शिरुरे यांनी नेमके कोणाकोणाला प्रश्नपत्रिका पुरवल्या, याचा शोध घेण्यासाठी सीबीआयचे पथक अंबाजोगाई आणि परभणी परिसरात दाखल झाले. अंबाजोगाई येथून काही संशयित विद्यार्थ्यांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. त्यानंतर पुढील सखोल तपासासाठी त्यांना लातूर येथे आणण्यात आले. या गैरव्यवहारात कोट्यवधी रुपयांची देवाणघेवाण झाल्याचा संशय आहे. त्यामुळे डॉ. शिरुरे यांच्या बँक खात्यांचे तपशील, त्यांचे निकटवर्तीय आणि परीक्षेपूर्वी झालेल्या संशयास्पद आर्थिक व्यवहारांची तपास यंत्रणांकडून कसून चौकशी सुरू आहे.

## सरकारचा शेतकऱ्यांना मोठा दिलासा

### शेती कामासाठी १००लिटर डिझेल मिळणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२बुलढाणा–** राज्यातील अनेक जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलच्या तुटवड्याने नागरिक हैराण झाले आहेत. विशेषतः शेतकऱ्यांना डिझेल मिळत नसल्याने शेतीची कामं खोळंबली आहे. टॅक्टर, शेती पंप यासह इतर कामासाठी डिझेलची गरज आहे. पण डिझेलच्या तुटवड्यामुळे संकट ओढावले आहे. त्यातच बुलढाणा जिल्ह्यातील एका पेट्रोल पंपावर डिझेल येताच शेतकऱ्यांची एकच गर्दी उसळल्याचे चित्र विदारक होते. या ठिकाणी अनेक जण ठेचाळलेत तर काही जण तोंडावर पडल्याचे दिसून येते. या सर्व घटनांची दखल घेत आता राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांना रोजच्या शेती मशागतीसाठी डिझेलचा पुरवठा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.शेतकऱ्यांना दररोज शेती मशागतीच्या कामासाठी १०० लिटर पर्यंत पेट्रोल डिझेल उपलब्ध करून देण्याचा आदेश पुरवठा विभागाने परभणीमध्ये दिला आहे. पूर्व मशागत आणि शेती कामांची अडचण बघता शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुरवठा विभागाने आदेश काढला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. शेतकरी अनेक ठिकाणी रात्र जागून पेट्रोलपंपावर रांगेत उभे ठाकले आहे. शेतीच्या कामांचा खोळंबा त्यामुळे झाला आहे. आता नवीन आदेशाने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.रोज शेती मशागतीच्या कामासाठी १०० लिटर पर्यंत पेट्रोल डिझेल उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पण त्यासाठी काही अटींची पूर्तता करावी लागणार आहे. पेट्रोल पंपवर आधार कार्ड सातबारा दाखवल्यास शेतकर्यांना शंभर लिटर पर्यंत पेट्रोल डिझेल उपलब्ध करून देण्याचे आदेश पुरवठा विभागाने दिला आहे. पेट्रोलियम नियम आणि मानकानुसार जाड प्लास्टिक किंवा धातूच्या कॅन मध्ये इंधन उपलब्ध करून देण्याचे आदेशही पुरवठा विभागाने दिले आहेत.

## संपादकीय ......

# शिंदे शिवसेनेचे ‘३० जागांचे स्वप्न’

अलीकडेच महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी गोवा दौर्यात येत्या विधानसभा निवडणुकीत शिंदे शिवसेना ३० जागा लढवेल अशी घोषणा केली आहे. ही घोषणा किती वास्तववादी आहे?

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हयातीत शिवसेनेने १९८९ पासून गोव्यात निवडणुका लढवायला सुरुवात केली. मराठी भाषिक पट्टा व ‘मराठी माणूस’ हा भावनिक धागा गोव्यात शिवसेनेसाठी जमेची बाजू होती. मात्र संघटनात्मक बांधणी व खमके स्थानिक नेतृत्व नसल्याने सेनेला एकही आमदार कधी मिळाला नाही. सुरुवातीच्या काळात शिवसेनेला जे ग्लॅमर होते, ते आज राहिलेले नाही. आज तो पक्ष तृणमूल काँग्रेस, आम आदमी पार्टीसारखाच परका वाटतो. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गोव्यात आमदार होते. २००२ व २००७ मध्ये पक्षाचे प्रत्येकी तीन आमदार निवडून आले. २०१२ साली एकही आमदार निवडून आला नाही. २०१७ साली पुन्हा एक आमदार निवडून आला. पण आज त्या पक्षाची अवस्थाही दयनीय आहे.

शिवसेनेच्या आतापर्यंत गोव्यातील कामगिरीचा आढावा घेतल्यास १९८९ च्या विधानसभा निवडणुकीत ६ उमेदवार, ४९६० मते. १९९९ मध्ये १४ जागा लढवून ५९८७ मते. २०१७ मध्ये ३ जागा लढवून फक्त ७९२ मते म्हणजे ०.०९ मत टक्का मिळवला. सर्व उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले. गोव्यात २७ वर्षांपूर्वी शिवसेनेला सहा हजारांच्या आसपास मते मिळाली होती. ती सर्वाधिक. आज गोव्याची मतदारसंख्या साडेअकरा लाखांच्या आसपास आहे. संघटनात्मक कार्य सोडा, गोव्यात अस्तित्वही नसताना ३० जागा लढवण्याची घोषणा महत्त्वाकांक्षीच म्हटली पाहिजे. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे गटाने राष्ट्रवादी काँग्रेससोबत युती करून १० जागा लढवल्या होत्या. संजय राऊत यांनी ममहाराष्ट्रातील महाविकास आघाडी मॉडेल गोव्यात राबवू, असे म्हटले होते. पण काँग्रेसने युती नाकारली. निकालात शिवसेनेला एकही जागा मिळाली नाही. २०२२ मध्ये शिवसेनेत उभी फूट पडली. एकनाथ शिंदे गटाने भाजपसोबत महाराष्ट्रात सत्ता स्थापन केली. उद्धव ठाकरे गट मविआमध्ये राहिला. आता गोव्यातही दोन्ही गट सक्रिय आहेत. १९ मे २०२६ रोजी उदय सामंत यांनी पणजीत जाहीर केले की, शिंदे शिवसेना गोव्यात सुमारे ३० जागा लढवेल. निवडणूक लढवणे हेच उद्दिष्ट नाही, तर गोव्यात सत्तास्थापन करायची आहे, असे सामंत म्हणाले. २०२३ मध्ये आनंद अडसूळ यांनीही पुढील निवडणुका लढवू, प्रचार मोहीम सुरू करू, असे सांगितले होते. संजय राऊत अजूनही उद्धव सेनेचे गोव्याचे प्रभारी आहेत. पण २०२२ पासून काहीच संघटनात्मक काम झालेले नाही.१९८९ ते २०२२ पर्यंत सेनेला गोव्यात एकही आमदार, एक टक्केपेक्षा जास्त मते कधीही मिळालेली नाहीत. बाळासाहेबांनंतर गोव्यात जनाधार असलेला चेहरा सेनेकडे नाही. संजय हरमलकर, रमेश नाईक यांच्या काळात आमदार नसला तरी लढवय्या पक्ष अशी शिवसेनेची इमेज होती. आज ती राहिलेली नाही. पक्षाला २०२२ मध्ये पणजीतून उमेदवारी मागे घेऊन उत्पल पर्रीकरांना पाठिंबा द्यावा लागला होता. बाळासाहेबांच्या नावावर गोव्यात भावनिक कनेक्ट आहे. पण मतांमध्ये त्याचे रूपांतर झालेले नाही. उदय सामंत यांची ३० जागांची घोषणा महत्त्वाकांक्षी आहे. पण ०.०९ मत टक्का ते ३० जागा हे अंतर प्रचंड आहे. दोन गटांतील भांडणामुळे कार्यकर्त्यांत संभ्रम आहे. महाराष्ट्रात शिंदे गट सत्तेत असला तरी गोव्यात स्वतंत्रपणे निवडणूक लढवून आमदार निवडून आणण्याएवढी पक्षाची शक्ती नाही.

गोव्यात १९९४ व १९९९ वगळता शिवसेना कधीही भाजपसोबत युतीत लढली नाही. याचे कारण महाराष्ट्रात ३० वर्षे भाजप-सेना युती होती. ‘मैत्रीमुळे आम्ही गोव्याकडे लक्ष दिले नाही’, असे आदित्य ठाकरे यांनी २०२२ मध्ये कबूल केले. भाजपने २०१९ नंतर ‘पाठीत खंजीर खुपसल्याने’ सेनेने स्वतंत्रपणे गोवा लढवायचे ठरवले. १९८९ ते १९९४ पर्यंत भाजप गोव्यात शिवसेनेप्रमाणेच चाचपडणारा पक्ष होता. तेव्हा त्यांना अधिकाधिक मित्रपक्षांची गरज होती. भाजपची मगो (महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष) सोबत युती होती. आज परिस्थिती पूर्णत: बदलली आहे. तेव्हा मगो हा गोव्यात मोठा भाऊ होता, जशी महाराष्ट्रात शिवसेना. आज महाराष्ट्र आणि गोव्यात शिवसेना व मगो छोट्या भावाच्या भूमिकेत आहे.

# ग्राहकांना पूर्वसूचना न देता वीज बंद केल्यास कारवाई

## फोन न उचलणाऱ्या व गणवेश न परिधान करणाऱ्या कर्मचाऱ्यांवरही होणार शिस्तभंगाची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती,**

वीज ग्राहकांना अधिक दर्जेदार, जबाबदार आणि पारदर्शक सेवा मिळावी यासाठी महावितरणने कडक भूमिका घेतली असून ग्राहकांना पूर्वसूचना न देता देखभाल-दुरुस्तीच्या नावाखाली वीजपुरवठा खंडित करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिला आहे. यासंदर्भात अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंत्यांना स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.सध्या तापमान ४६ अंश सेल्सिअसच्या पुढे गेल्याने नागरिकांना उष्णतेचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अशा परिस्थितीत तांत्रिक बिघाडामुळे होणारा आपत्कालीन वीजपुरवठा खंडित होणे किंवा नियोजित देखभाल-दुरुस्तीमुळे वीज बंद ठेवली जाणे ही बाब ग्राहकांसाठी अधिक त्रासदायक ठरत आहे. अनेकदा ग्राहकांना कोणतीही पूर्वकल्पना न देता वीजपुरवठा बंद करण्यात येत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे ग्राहकाभिमुख सेवा



सुधारण्यासाठी महावितरण प्रशासनाने ही कठोर भूमिका घेतली आहे.मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी स्पष्ट केले की, संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील मुख्यालयात वास्तव्यास राहणे बंधनकारक आहे. आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ प्रतिसाद देणे अपेक्षित असून मुख्यालयी न राहिल्यामुळे तक्रारींच्या निवारणास विलंब होत असल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल.तसेच वीज ग्राहकांचे फोन न उचलणे किंवा प्रतिसाद देण्यास टाळाटाळ करणे ही गंभीर बाब मानण्यात येणार आहे. वीजपुरवठा खंडित होणे, तांत्रिक अडचणी किंवा अन्य आपत्कालीन परिस्थितीत ग्राहकांना योग्य माहिती व मार्गदर्शन मिळणे आवश्यक असल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांना सतत संपर्कात राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.याशिवाय कामकाजादरम्यान निर्धारित गणवेश परिधान करणेही अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे ग्राहकांना संबंधित कर्मचाऱ्यांची ओळख पटण्यास मदत होईल व सेवेत पारदर्शकता वाढेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. ग्राहकसेवेत कोणतीही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसल्याचा स्पष्ट इशाराही मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिला.वीज ग्राहकांनी तक्रारींचे तत्काळ निवारण व्हावे यासाठी महावितरणच्या ऑनलाईन पोर्टल व संकेतस्थळाचा वापर करावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# बैलगाडीतून निघणाऱ्या वरातींची परंपरा लोप पावताना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२आसेगाव पूर्णा**



लग्न हा दोन जीवांच्या मनोमिलनाचा आणि सामाजिक ऐक्याचा आनंदोत्सव मानला जातो. पूर्वी ग्रामीण भागातील लग्नसोहळ्यांमध्ये बैलगाडी आणि बैलजोडी यांना विशेष महत्त्व होते. नवरदेवाची वरात सजविलेल्या बैलगाडीतून निघणे ही एक मानाची आणि आकर्षणाची बाब मानली जायची. मात्र, आधुनिक चारचाकी वाहनांच्या वाढत्या वापरामुळे ही पारंपरिक प्रथा आता हळूहळू लुप्त होत चालली आहे.

काही दशकांपूर्वी ग्रामीण भागात दुचाकी आणि चारचाकी वाहने फारच कमी प्रमाणात होती. त्यामुळे लग्नातील वर-वधू, वऱ्हाडी आणि पाहुण्यांच्या प्रवासासाठी बैलगाडी, रेंगी, खासर आणि दमणी हीच प्रमुख साधने होती. गावातील नातेवाईक, शेजारी आणि परिचित आपल्या बैलगाड्या सजवून वरातीत सहभागी होत असत. विशेषत: नवरदेवासाठी सजविलेली बैलगाडी आणि देखणी बैलजोडी हे वरातीचे मुख्य आकर्षण असायचे.लग्नाची तारीख ठरल्यानंतर वरात किती अंतरावर जाणार, किती बैलगाड्या लागणार याचे नियोजन आधीच केले जाई. बैलांना सजविणे, गाड्यांची दुरुस्ती आणि प्रवासाची तयारी यासाठी गावभर उत्साहाचे वातावरण असायचे. कुलदैवताची पूजा आणि गावातील हनुमान मंदिरात दर्शन घेतल्यानंतरच वरात मार्गस्थ होत असे.त्या काळातील बैलगाड्यांच्या लांबलचक ताफ्याने गावातील रस्ते गजबजून जात. वरातीत सहभागी झालेल्या वऱ्हाडींसाठी हा प्रवास आनंददायी आणि अविस्मरणीय अनुभव ठरायचा. वाटेत बैलांना तलाव किंवा पाणवठ्यावर पाणी पाजले जाई. लांबच्या गावात वरात पोहोचण्यास उशीर झाल्यास मधल्या गावात मुक्कामही केला जाई. यामुळे परस्पर सहकार्य, सामूहिक भावना आणि एकोप्याचे दर्शन घडत असे.आज पन्नाशी ओलांडलेल्या अनेक ज्येष्ठांच्या आठवणीत बैलगाडीतून निघालेल्या वरातींचे चित्र अजूनही जिवंत आहे. मात्र, काळाच्या ओघात आधुनिक वाहनांनी बैलगाडीची जागा घेतली असून ग्रामीण संस्कृतीतील ही वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आता इतिहासजमा होत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे.-

# बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर मनपा मध्ये पार पडली बैठक

**विदर्भाप्रजासत्ताक**
**दि.२२ अमरावती**



अमरावती महानगरपालिकेत आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी आयुक्त वर्षा लड्डा यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. बैठकीत शहरातील कायदा व सुव्यवस्था, स्वच्छता, पाणीपुरवठा, जनावरांच्या वाहतुकीवर नियंत्रण तसेच गौवंश संरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी विविध विभागांचे अधिकारी, पोलीस प्रशासन, पशुवैद्यकीय अधिकारी तसेच मुस्लिम बांधव उपस्थित होते.सणाच्या काळात नागरिकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी २७ ते २९ मे दरम्यान संवेदनशील भागात विशेष स्वच्छता निरीक्षकांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला. अतिरिक्त स्वच्छता कर्मचारी, कचरा कंटेनर, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उपलब्ध करण्याचे निर्देश देण्यात आले. जनावरांच्या वाहतुकीदरम्यान रस्त्यावर अस्वच्छता होऊ नये यासाठी विशेष दक्षता घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.गौवंश संरक्षण कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देत संशयास्पद प्रकार आढळल्यास तात्काळ पोलीस व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच मोकाट जनावरांवर कारवाईसाठी विशेष पथक नेमण्यात येणार असून त्यांना पोलीस संरक्षण दिले जाणार आहे. प्रशासन, पोलीस व नागरिकांच्या समन्वयातून बकरी ईद शांततेत आणि स्वच्छतेत साजरी करण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

# गायींची कत्तल थांबविण्यासाठी मोहीम राबवा

## विहिंप व बजरंग दलचे पोलीस आयुक्तांना निवेदन

विदर्भ प्रजासत्ताकदि.२२अमरावती ४



जिल्ह्यात कोणत्याही प्रकारे गायीची कत्तल होणार नाही याची काळजी घेण्यात यावी, अशी मागणी विश्व हिंदू परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे. विहिंप व बजरंग दलच्या वतीने आज गुरुवारी पोलीस आयुक्त राकेश ओला यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनानुसार, संपूर्ण हिंदू समाज गाईला माता मानतो. गाईमध्ये परमेश्वर बघून तिची पूजा करतो. त्यामुळे विश्व हिंदू परिषद, बजरंग दल २७ तारखेला साजऱ्या बकरी ईदच्या पर्वावर याबाबतची काळजी घेण्याचे आवाहन विहिंपद्वारा करण्यात आले. गायींची कत्तल होवू नये म्हणून अनेक प्रयत्नानंतरही, या विषयावर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. येणाऱ्या ईदच्या दिवशी कुर्बानीच्या नावाखाली कतलीच्या उद्देशाने शहरातीलविशिष्ट भागात मोठ्या संख्येने गायी पोहोचल्या आहेत. महाराष्ट्र सरकारने २०१५ मध्ये लागू केलेल्या गोवंश हत्या प्रतिबंधक कायद्या चेही उल्लंघन केले जात आहे. त्यामुळे येणाऱ्या बकरी ईदला मोठ्या प्रमाणात गोवंश हत्या होण्याची शक्यता आहे. ही बाब बेकायदेशीर आहे. यामुळे हिंदूंच्या भावना दुखावण्याची शक्यता आहे. परंतु गोवंश हत्याच्या मुद्द्यावरकायदा आणि सुव्यवस्था निर्माण झाली नाही तर प्रशासन पूर्णपणे जबाबदार असणार असल्याचे विहिंपने म्हटले. सर्व प्रकारच्या कायद्यांचा वापर करून यावर त्वरित बंदी घालण्यात यावी. बकरी ईदला फक्त बकऱ्यांचा बळी द्यावा, गायींचा नाही, जर असे काही आढळून आले आणि हिंदू धर्म भावना दुखावल्या गेल्या तर बजरंग दल आपल्या भाषेत गौतस्करांना उत्तर देईल असेही सांगण्यात आले.यावेळी गौरक्षा प्रमुख दुर्गेश ठाकुर, सहप्रमुख अक्षय निनावे, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा अध्यक्ष अनिल साहू, बजरंग दल प्रांत सहसंयोजक बंटी पारवानी, महानगर संयोजक त्रिदेव डेंडवाल, प्रचारक विशाल गुप्ता, प्रकाश लुगवीकर, कार्तिक नाचनकर, अजिंक्य काटे, प्रिन्स कोठार, गौरव कोरडे, बिझेश गुप्ता, यश गुप्ता, ओम नथ्थुकार आदी उपस्थित होते.

# महावितरण अभियंत्याच्या घरची वीज खंडित करणार !

## माजी नगरसेवक धनंजय बोकडेयांचा प्रशासनाला इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२ वरुड**

गेल्या काही महिन्यांपासून वरुड शहरात सुरू असलेल्या वीज वितरणाच्या सावळागोंधळावर आणि अवेळी होणाऱ्या विजेच्या लपंडावावर नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर, शहराची वीजवितरण व्यवस्थात्वरीत न सुधारल्यास थेट महावितरण अभियंत्याच्या घरचीच वीज बंद करण्याचा इशारा माजी नगरसेवक धनंजय बोकडे यांनी दिला आहे. यामुळे वरुडमधील राजकीय आणि सामाजिक वातावरण तापण्याची शक्यता आहे.सध्या वरुडशहरात तापमानाचापारा ४५ ते ४६ अंशांवर पोहोचला असून, नागरिक कडक उन्हाने होरपळून निघत आहेत. अशा भीषण परिस्थितीत दुरुस्तीच्या नावाखाली भर दिवसा आणि रात्री-बेरात्री कधीही वीजखंडित केली जात आहे. यापूर्वी विनायक वाळीवे हे विद्युत अभियंता म्हणून धनंजय बोकडे कार्यरत असताना शहराची वीजवितरण व्यवस्था अत्यंत सुरळीत होती, अशी आठवण बोकडे यांनी करून दिली. मात्र, सध्याचेनवीन अभियंता आपली जबाबदारी गांभीर्याने पार पाडत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. महावितरणचे अभियंता जनतेच्या सहनशिलतेचा गैरफायदा घेत असून, ते जणू नागरिकांचा अंत पाहत आहेत, असा घणाघात बोकडेयांनी केला. वीज गुल झाल्यावर सामान्य जनतेला कोणत्या यातना सहन कराव्यालागतात, याची जाणीव आता संबंधित अधिकाऱ्यालाही करून दिली जाईल, असे बोकडे म्हणाले. आता यापुढे जर कोणतीही पूर्वकल्पना न देता किंवाविनाकारणशहराची वीज खंडितझाली. तर थेट महावितरणच्या अभियंत्याच्या घरचा वीजपुरवठा खंडित करण्यात येईल. याचे परिणाम काहीही झाले तरी आम्ही मागे हटणार नाही. माजी नगरसेवक धनंजय बोकडे यांनी या संदर्भात तहसीलदार आणि पोलीस प्रशासनालाही पूर्वकल्पना दिली आहे. या इशाऱ्याची प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी. आंदोलन किंवा वीज खंडित करण्याच्या या प्रकारानंतर कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण झाल्यास, त्याला सर्वस्वी महावितरणचे अभियंता आणि प्रशासनच जबाबदार राहील, असा इशारा वजा धमकीच त्यांनी पत्राद्वारे दिली आहे. आता या कडक इशाऱ्यानंतर वरुडमधील महावितरण प्रशासन शहराचा वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी काय पावले उचलते, याकडे संपूर्ण वरुडवासीयांचे लक्ष लागले आहे.

# ज्येष्ठ समाजसेवक जनार्दनपंत बोथे यांना पद्मश्री पुरस्कार

## राष्ट्रपतींच्या हस्ते नवी दिल्लीत सोमवारी सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ जनार्दनपंत बापूराव बोथे यांना ‘पद्मश्री’ पुरस्कार जाहीर झाला असून सोमवार, २५ मे रोजी नवी दिल्लीत एका विशेष सन्मान सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.शिक्षण संस्थेची स्थापना : १९७२ मध्ये ‘राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज शिक्षण संस्थेची’ स्थापना केली. या



माध्यमातून महाराष्ट्रातील आदिवासी आणि वंचित भागांत शाळा व वसतिगृहे सुरू करून हजारो दलित, आदिवासी व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिक्षण आणि जीवन कौशल्यांचे प्रशिक्षण दिले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# रतन इंडिया प्रकल्पातील राख वाहतुकीवरून आरटीओच्या भूमिकेवर प्रश्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२ नांदगाव पेठ**

येथील पंचतारांकित एमआयडीसीतील रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पाविरोधात पुन्हा एकदा गंभीर आरोप समोर आले असून, राख वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त भार भरून दिला जात असल्याचा आरोप प्लॉय ॲश ट्रान्सपोर्ट युनियनने केला आहे. याप्रकरणी प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती येथे लेखी तक्रार दाखल करण्यात आली असून, मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील कलम १९९ अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापनावर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.



ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या तक्रारीनुसार, कंपनीकडून राख वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांमध्ये नियमबाह्य पद्धतीने अतिरिक्त भार भरला जात आहे. यामुळे वाहनचालकांवर कारवाईचा धोका निर्माण होत असून, रस्ते अपघातांची शक्यता देखील वाढत आहे. विशेष म्हणजे, याबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालयाने यापूर्वीच दिनांक ०८ ऑक्टोबर २०२४ रोजी पत्र क्रमांक ३४०९ द्वारे कंपनीला नोटीस बजावून क्षमतेपेक्षा जास्त भार न भरण्याचे निर्देश दिले होते. तसेच नियमांचे उल्लंघन झाल्यास मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील कलम १९९ प्रमाणे कारवाईचा इशाराही देण्यात आला होता.मात्र, प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे कंपनीकडून आजही ओव्हरलोड राख वाहतूक सुरूच असल्याचा आरोप असोसिएशनने केला आहे.

**ओव्हरलोड राख वाहतुकीमागे 'मलिदा'**

रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पातून राख वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त राख भरली जात असल्याचे गंभीर आरोप आहेत. अतिरिक्त पैशांच्या मोहापोटी आरटीओ नियमांची पायमल्ली होत असल्याची चर्चा असून, या ओव्हरलोड वाहतुकीमुळे अपघाताचा धोका वाढला आहे. वाहनचालकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या या प्रकारावर तातडीने आळा घालण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

कंपनी परिसरात वजन काटा उपलब्ध असतानाही नियमानुसार वजन करून वाहने सोडली जात नसल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकारामुळे वाहनधारक, चालक आणि ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून कंपनीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे बलवीर चव्हाण, राजू चिरडे, अभिषेक गावंडे, सतीश तायडे, उमेश डोईफोडे यांच्यासह शेकडो पदाधिकारी यांच्या

वतीने करण्यात आली आहे. तसेच, नियमबाह्य ओव्हरलोड वाहतुकीमुळे रस्त्यांची होणारी हानी आणि अपघातांचा धोका लक्षात घेता प्रादेशिक परिवहन विभागाच्या भूमिकेकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

स्वच्छ भारत व माझी वसुंधरा अभियानांतर्गत

# सीड बॉल कार्यशाळा उत्साहात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

अमरावती महानगर पालिकेच्या वतीने स्वच्छ भारत अभियान आणि माझी वसुंधरा अभियान अंतर्गत पर्यावरण संवर्धन व वृक्षलागवडीबाबत जनजागृती करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली पर्यावरणपूरक सीड बॉल कार्यशाळा शहीद स्मारक कस्तुरबा उद्यान, नेहरू मैदान, राजकमल चौक येथे उत्साहात पार पडली. सकाळी ९ वाजता आयोजित या कार्यशाळेला अधिकारी, कर्मचारी आणि पर्यावरणप्रेमी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.वाढते प्रदूषण आणि तापमान लक्षात घेता वृक्षसंवर्धनाची गरज अधोरेखित करत मनपाने हा उपक्रम राबविला. कार्यशाळेत सीड बॉल म्हणजे काय, त्याची निर्मिती कशी केली जाते आणि पावसाळ्यात त्याचा वापर करून वृक्षलागवड कशी वाढविता येते याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थितांनी माती, शेणखत आणि विविध वनस्पतींच्या बियांचा वापर करून प्रत्यक्ष सीड बॉल तयार



केले.महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारणे आवश्यक असल्याचे सांगितले. शहर अधिक हरित आणि स्वच्छ ठेवण्यासाठी वृक्षलागवड महत्त्वाची असून, सीड बॉलसारखे उपक्रम लोकसहभाग वाढविण्यास प्रभावी ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. युवकांनी पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.या कार्यशाळेत अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, नंदकिशोर तिखिले, नितीन बोबडे, मनोज शहाळे, डॉ. विशाल काळे, डॉ. अजय जाधव, डॉ. प्रकाश मेश्राम, डॉ. सचिन बोंद्रे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच इंजि. हरिहर बोचरे, रश्मी नावंदर, संतोष ठाकूर आदी पर्यावरणप्रेमींनी सहभाग नोंदविला.कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी उद्यान अधीक्षक अजय विंचुरकर, श्रीकांत गिरी, महेश जोशी व उद्यान विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. भविष्यातही शहर हरित आणि सुंदर करण्यासाठी अशा विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# अमरावती परिक्षेत्रीय पोलीस विभागाची फॉरेन्सिक्स कार्यशाळा संपन्न

**वैज्ञानिक तपास पद्धतींवर भर; २६० पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सहभाग**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२ अमरावती :**

अमरावती परिक्षेत्रीय पोलीस विभागाच्या वतीने विद्याभारती महाविद्यालय, अमरावती येथे फॉरेन्सिक्स कार्यशाळा आयोजित करण्यात आली. गुन्ह्यांमधील दोषसिद्धीचे प्रमाण वाढविणे, तपास अधिकाऱ्यांना वैज्ञानिक तपास पद्धतींबाबत प्रशिक्षित करणे आणि आधुनिक फॉरेन्सिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर वाढविणे हा कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.कार्यशाळेमध्ये फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीच्या विविध विभागांची सविस्तर माहिती देण्यात आली. यामध्ये डीएनए विश्लेषण, सायबर फॉरेन्सिक्स, दस्तऐवज परीक्षण, बॅलिस्टिक, नार्कोटिक्स आणि केमिकल ॲनालिसिस यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन



करण्यात आले.सध्याच्या डिजिटल युगात सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता सायबर फॉरेन्सिक्सचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. मोबाईल फोन, सोशल मीडिया, डिजिटल व्यवहार, सीसीटीव्ही फुटेज, ई-मेल आणि आयपी लॉग्स यांसारख्या डिजिटल पुराव्यांचे संकलन, जतन आणि विश्लेषण यामध्ये सायबर फॉरेन्सिक्स विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे वक्त्यांनी सांगितले.कार्यशाळेत वैज्ञानिक पुरावे न्यायालयीन प्रक्रियेत अत्यंत विश्वासार्ह मानले जात असल्याने तपास अधिकाऱ्यांनी पुरावे योग्य पद्धतीने संकलित करून त्यांचे वैज्ञानिक विश्लेषण करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. यामुळे गुन्हेगारांविरोधात भक्कम पुरावे उभे राहून दोषसिद्धीचा दर वाढण्यास मदत होते, तसेच निष्पाप व्यक्तींना न्याय मिळवून देण्यातही फॉरेन्सिक विज्ञानाची महत्त्वाची भूमिका असल्याचे सांगण्यात आले.या कार्यशाळेत अमरावती परिक्षेत्रातील अमरावती ग्रामीण, वाशिम, यवतमाळ, अकोला आणि बुलढाणा पोलीस घटकांतील सुमारे २६० वरिष्ठ पोलीस अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. तसेच शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनवर कार्यरत अधिकारीही उपस्थित होते.ही कार्यशाळा विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेचे संचालक डॉ. विजय ठाकरे, सहायक संचालक निलेश पाटील, उपसंचालक वैषाली महाजन तसेच विद्याभारती फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य श्रीकांत पांडे उपस्थित होते.कार्यशाळेचे आयोजन पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावती ग्रामीण पोलीस दलाने केले.

माझी लाडकी बहिण योजनेत ई-केवायसीसाठी

# कार्यालयात कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २२ अमरावती-**




मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसी करण्याच्या मुदतीत योग्य ती कागदपत्रे सादर करू न शकलेल्या लाडक्या बहिणींना जिल्ह्यांच्या महिला व बाल विकास विभागात कागदपत्रे सादर करण्याची मुभा देण्यात आलेली आहे, अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे. याबाबत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ई-केवायसी करू शकले नाही अशा महिलांना जिल्ह्यांच्या महिला व बाल विकास विभागात कागदपत्रे सादर करण्याचे कोणतेही निर्देश शासनस्तरावरून देण्यात आलेले नाही. या बातमीमुळे योजनेच्या लाभार्थी महिलांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. बातमीमुळे महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय शहर व तालुकास्तर कार्यालयात महिलांचा जमाव होत आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता अशा चुकीच्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. काही लाभार्थ्यांचे माहे फेब्रुवारी २०२६चा हप्ता दि. २८ मार्च व दि. २९ मार्च २०२६ रोजी जमा झालेला आहे. मार्च २०२६चा हप्ता लवकरात लवकर जमा होणार असल्याने लाभार्थींनी संयम ठेवावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय गट यांनी केले आहे.

# खरीप हंगामासाठी महाबीज सज्ज

## तूर, सोयाबीनसह विविध बियाण्यांचे पॅकेटिंग सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती :**

आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार आणि प्रमाणित बियाणे वेळेत उपलब्ध व्हावे, यासाठी मार्डी रोडवरील महाबीज कार्यालयात बियाण्यांचे पॅकेटिंग युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. विविध पिकांच्या बियाण्यांची साठवण, प्रक्रिया आणि पॅकेट तयार करण्याचे काम सध्या कामगारांकडून वेगाने सुरू आहे.महाबीजकडून यंदा सर्वाधिक मागणी सोयाबीन




बियाण्यांची असून सुमारे १५०० क्किंटल सोयाबीन बियाणे तयार करण्यात येत आहेत. त्यासोबतच तुरीच्या ५५० क्किंटल बियाण्यांचे पॅकेटिंग सुरू असून उडीद व संकरित मका या पिकांचे प्रत्येकी १०० क्किंटल बियाणे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. बीटी कापसाचे सुमारे ३ हजार पॅकेट्सही तयार करण्यात आले आहेत.याशिवाय सेंद्रिय शेतीला चालना देण्यासाठी २०० लिटर जैविक उत्पादने तसेच ७ हजार लिटर जैविक खतांचा साठाही तयार ठेवण्यात आला आहे. खरीप हंगाम सुरू होण्यापूर्वीच शेतकऱ्यांना आवश्यक बियाणे आणि कृषी साहित्य उपलब्ध करून देण्याचा महाबीजचा प्रयत्न असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, महाबीज संस्थेला यंदा ५० वर्षे पूर्ण होत असून त्या निमित्ताने संपूर्ण वर्षभर सुवर्ण महोत्सव वर्ष साजरे करण्यात येणार आहे. या निमित्ताने विविध कृषी जनजागृती उपक्रम, शेतकरी मेळावे आणि विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहितीही देण्यात आली.

# सिंचनासाठी यंदा धरणांतील पाण्यावर मोठी भिस्त

## जलसाठा टिकला तरच खरीपाला दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

जिल्ह्यातील पाणीसाठा लक्षात घेता सिंचन प्रकल्पातही गतवर्षीचा काही पाणीसाठा शिल्लक असल्याने यावर्षी सिंचनासाठी व पुरवठ्यासाठी मुबलक साठा निर्माण होण्याचा अंदाज आहे. सद्य:स्थितीत जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांत ४२.१६ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे आगामी पावसाळ्यात जिल्ह्यातील या ५६ प्रकल्पातूनच पाण्याचा विसर्ग करण्याची वेळ येणार असल्याचे सध्याचे चित्र दिसून येत आहे..



अमरावती जिल्ह्यात अप्पर वर्धा या मोठ्या धरणांत सध्या २६५.०५ दशलक्ष घनमीटर (टीएमसी) जलसाठा शिल्लक असून तो एकूण जलसंचय क्षमतेच्या ४४.९९ टक्के आहे. या धरणातून अमरावती शहरासह ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना पाणीपुरवठाकरण्यात येतो. तसेच एकूण सात मध्यम प्रकल्प असून त्यातील शहानूरमध्ये १९.१६ दशलक्ष घनमीटर, चंद्रभागामध्ये ३२.९६ दशलक्ष घनमीटर, पूर्णा प्रकल्पांत २२.६० दशलक्ष घनमीटर, सपनमध्ये १७.४८ दशलक्ष घनमीटर, पंढरीमध्ये १२.५० दशलक्ष घनमीटर जलसाठा शिल्लक आहे.

सर्व मध्यम प्रकल्प मिळून १०५.०३ दशलक्ष घनमीटर जलसाठा असून एकूण जलसंचय क्षमतेच्या तो ४०.९९ टक्के आहे. ४८ लघू प्रकल्पांत ४४१.५८ दशलक्ष घनमीटर साठा आहे. दरम्यान जलसंपदा विभागाने खबरदारीचे उपाय योजण्यास सुरुवात केली आहे. आणखी महीनाभर पाणी पुरवण्याचे आव्हान समोर असून प्रत्यक्ष धरणक्षेत्रात पावसाला सुरुवात झाल्यानंतरच जलसाठ्यात वाढ होणार आहे.-

# शाळेच्या पहिल्या दिवशी मिळणार पाठ्यपुस्तके

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२परतवाडा**

शासनाकडून इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत मोफत वितरित करण्यात येणारी पाठ्यपुस्तके पंचायत समिती शिक्षण विभागाला नुकताच प्राप्त झाली आहेत. शिक्षण विभागाकडून शाळेच्या पहिल्या दिवशी पुस्तके वाटपच्या दृष्टीने नियोजन सुरू आहे. नगरपरिषद, जिल्हा परिषद आदी शासकीय तसेच खासगी अनुदानित शाळांतील पहिले ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शासनाकडून मोफत पाठ्यपुस्तके वितरित करण्यात येतात पंचायत समितीत नुकताच पहिल्या टप्प्यात आलेली पुस्तके शिक्षण



विभागाकडून शिक्षण विभाग व समग्र सभागृहामध्ये उतरविण्यात आली आहेत. स्थानिक पाठ्यपुस्तके वितरणाचे काम दरवर्षीप्रमाणे यावर्षीही विषयतज्ञ सुनील वरखडे पाहत आहेत. शाळेच्या पहिल्या दिवशी प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात पुस्तके पडणार असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले. यावेळी गटशिक्षणाधिकारी नंदकिशोर खरात, विस्तार अधिकारी राम चौधरी, प्रभारी विस्तार अधिकारी प्रेमलाल भिलावेकर, विषय तज्ञ रावसाहेब मोरे, धर्मराज वानखडे, शारदा नवलकर, तृप्ती बिजवे, समग्र वरिष्ठ लेखा सहायकराहुल चित्रकार, डाटा एन्ट्री ऑपरेटर कम असिस्टंट प्रवीण अळसपूरकर आदी शिक्षण विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

# नर्सवरील अत्याचार प्रकरणात यशोमती ठाकूर आक्रमक

## परिचारिका संघटनेकडून निवेदन, सुरक्षा उपायांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती :** जिल्हा सामान्य रुग्णालयातील एका महिला नर्सवर झालेल्या शारीरिक व आर्थिक अत्याचाराच्या प्रकरणाला आता राजकीय वळण मिळाले आहे. या प्रकरणात प्रशासनाने गांभीर्याने दखल घेतली नसल्याचा आरोप करत महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना, अमरावती शाखेच्या पदाधिकाऱ्या ंनी आज माजी पालकमंत्री तथा काँग्रेस नेत्या



यशोमती ठाकूर यांच्या निवासस्थानी जाऊन निवेदन सादर केले.यावेळी संघटनेच्या प्रतिनिधींनी महिला परिचारिकांवरील वाढते अत्याचार, रुग्णालयातील अपुरी सुरक्षा व्यवस्था तसेच प्रशासनाच्या निष्क्रियतेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन यशोमती ठाकूर यांनी तातडीने जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून संबंधित प्रकरणात योग्य कारवाई करण्याचे आश्वासन दिले.तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयातील महिला नर्सेसच्या सुरक्षेसाठी डीपीसी निधीतून सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे आणि इतर आवश्यक सुरक्षा उपाय तत्काळ राबविण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी परिचारिका संघटनेने आंदोलन सुरू ठेवण्याचा इशाराही दिला आहे.

# महायुतीकडून युवा स्वाभिमान पार्टीला उमेदवारी द्या

## विधान परिषदेसाठी सुनिल राणा यांच्यासह चौघांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

अमरावती विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युवा स्वाभिमान पार्टीच्या कोअर कमेटीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत महायुतीकडून अमरावती विधान परिषद मतदारसंघ युवा स्वाभिमान पार्टीला सोडण्यात यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष निळकंठराव कात्रे यांच्याकडे याबाबत निवेदनही सादर करण्यात आले.यावेळी सुनिल राणा, उपमहापौर सचिन भेंडे, डॉ. अविनाश चौधरी आणि संजय भारसाकळे यांनी विधान परिषदेसाठी पक्षाकडून उमेदवारी मिळावी, अशी अधिकृत मागणी केली. बैठकीत पदाधिकाऱ्यांनी युवा स्वाभिमान पार्टीने गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामीण व शहरी भागातील जनसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने संघर्ष केला असल्याचे सांगितले. पक्षाची जिल्ह्यात मजबूत संघटनात्मक ताकद निर्माण झाली असून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही प्रभावी संख्याबळ असल्याचा दावा करण्यात आला.पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, युवा स्वाभिमान पार्टी ही महायुतीची विश्वासू सहयोगी असून आगामी निवडणुकीत पक्षाला उमेदवारी दिल्यास कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह निर्माण होईल. त्याचा थेट फायदा महायुतीला होऊ शकतो. तसेच मतदारांमध्ये पक्षाबद्दल सकारात्मक वातावरण असल्याचे ही त्यांनी नमूद केले. बैठकीत पक्षाने नेहमीच सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर भूमिका घेत विकासाच्या मुद्द्यांना प्राधान्य दिल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे विधान परिषदेत पक्षाला प्रतिनिधित्व मिळणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. बैठकीच्या शेवटी महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांनी युवा स्वाभिमान पार्टीच्या मागणीचा सकारात्मक विचार करून अमरावती विधान परिषद मतदारसंघ पक्षाला द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यावेळी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नांगरणीसाठी ८०० रु., वखरणीसाठी ७०० रु. प्रतितास खर्च

## ट्रॅक्टरद्वारे शेतीच्या मशागत खर्चामध्ये मोठी वाढ



विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२२ मोर्शी**

खरीप हंगामाची चाहूल लागताच अमरावती जिल्ह्यात शेतीच्या मशागतीची कामे वेगाने सुरू झाली आहेत. परंतु, डिझेल दरवाढ, सुट्या भागांचे दर तसेच मजुरीतील वाढ यामुळे ट्रॅक्टरद्वारे शेतीच्या तयारीचा खर्च ग्रामीण भागात प्रचंड वाढलेला दिसत आहे. त्यामुळे आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या अनेक शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. ग्रामीण भागातील बहुसंख्य शेतकरी नांगरणी, वखरणी, रोटाव्हेटर आणि इतर मशागत कामांसाठी ट्रॅक्टरवर अवलंबून आहेत. मागील काही दिवसांमध्ये झालेल्या डिझेल दरवाढीमुळे ट्रॅक्टर धारकांनी प्रतितास भाड्यात वाढ केली असून, काही ठिकाणी तर डिझेलसाठी भटकंती करावी लागत आहे. हा अतिरिक्त अतिरिक्त खर्च शेतकऱ्यांच्या तोंडाला फेस आणत आहे.

ट्रॅक्टरचालकांची मागणी वाढल्याने भाडेदरही वाढले आहेत. नांगरणीसाठी प्रतितास ७०० ते ८०० रुपये, तर वखरणीसाठी ६०० ते ७०० रुपये आकारले जात असल्याचे स्थानिक शेतऱ्यांनी सांगितले. काही भागांत तर वेगळ्या पद्धतीने ८०० रुपयांपेक्षाही अधिक रक्कम आकारली जात असल्याची चर्चा आहे. ट्रॅक्टरचे सुटे भाग महाग झाले असून दुरुस्तीसाठी लागणारा खर्च वाढला आहे. तसेच डिझेल दरवाढीमुळे एकूणच खर्च वाढल्याने ट्रॅक्टर मालकही भाडे वाढविण्यास बाध्य झाले आहेत. दुसरीकडे मजुर सहज उपलब्ध होत नसून मजुरीच्या वाढलेल्या खर्चामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे.

सरकारच्या पेट्रोल-डिझेल दरवाढीचा सर्वत्र निषेध केला जात असून, जनतेने सरकारवर तीव्र ताशेरे ओढले आहेत. सतत वाढणाऱ्या इंधन दरामुळे वाहतूक, शेती आणि घरगुती खर्चात मोठी भर पडली आहे. महागाईचे ओझे वाढत असताना सरकार दर कपात करण्याऐवजी जनतेच्या खिशावरच डल्ला मारत असल्याची टिका नागरिकांनी केली आहे. इंधन दर नियंत्रणात ठेवण्यात सरकार अपयशी ठरल्याचा आरोपही करण्यात येत आहे. दरवाढ तातडीने मागे घेऊन सर्वसामान्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी नागरिक आणि शेतकरीवर्गाकडून होत आहे.

# एसडीओ, तहसीलदारांसह ६३ अधिकारी, कर्मचारी निवडणुकीच्या दिमतीला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**




## नियोजन भवन येथे राहणार स्ट्राँग रुम
## मतदारांना प्रलोभन देणाऱ्यांवर राहणार नजर

विधानपरिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाने तयारी पूर्ण केली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सात उपविभागीय अधिकारी (एसडीओ) आणि १४ तहसीलदार यांच्या नियंत्रणाखाली सात मतदान केंद्रांवर निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. प्रत्येक केंद्रावर सहा पोलीस कर्मचाऱ्यांसह एकूण ४२ कर्मचारी नियुक्त करण्यात येणार असून प्रत्येक मतदान केंद्रासाठी स्वतंत्र वाहनही सज्ज ठेवण्यात येणार आहे. सोमवारी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर उमेदवारी अर्ज १ जूनपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहेत. त्यानंतर १८ जून रोजी मतदान तर २२ जून रोजी मतमोजणी होणार आहे. जिल्ह्यातील एकूण४५३ मतदार या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावणार आहेत. निवडणुकीदरम्यान लोकसभा आणि विधानसभा निवडणुकां प्रमाणेच आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. आचारसंहितेचे पालन सुनिश्चित करण्यासाठी जिल्हा आणि तालुकास्तरावर विविध पथके गठित करण्यात येणार आहेत. मतदारांची संख्या कमी असल्याने मतदारांना प्रलोभन देण्याचे प्रकार होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने विशेष दक्षता घेण्याचा निर्णय घेतला आहे. मतदानानंतर सर्व मतपेट्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे तयार करण्यात आलेल्या स्ट्राँग रुममध्ये जमा करण्यात येणार आहेत. तेथे चार दिवस कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार असून २२ जून रोजी याच ठिकाणी मतमोजणी पार पडेल. ही निवडणूक बॅलेट पेपरवर होणार असल्याने आणि मतदारसंख्या मर्यादित असल्यामुळे निकालही अल्पावधीत जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे

# घरी बोलावून मंत्री केलं, ही माझी चूक

## बच्चू कडूंवर उद्धव ठाकरेंची टीका



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई**-शिवसेना नेते उद्धव ठाकरेंनी बच्चू कडू यांच्यावर शिंदेसेनेत प्रवेश केल्याप्रकरणी जोरदार टीका केली आहे. आपल्यातून जो गेला तो देखील जुना शिवसैनिकच होता. घरी बोलावून मंत्री केलं ही माझी चूक होती, अशी टीका उद्धव ठाकरेंनी कडू यांच्यावर केली. बच्चू कडू यांनी काही दिवसांपूर्वी प्रहार जनशक्ती राजकीय पक्ष शिंदेंच्या शिवसेनेत विलीन करुन धुनष्यबाण हाती घेतला. या पक्षप्रवेशावरुन उद्धव ठाकरेंनी बच्चू कडूंवर निशाणा साधला आहे.

आपल्यातून जो गेला तो जुना शिवसैनिकच होता. घरी बोलवून मंत्री केला ही माझी चूक झाली. लोभापायी जे गेले त्यांना जाऊ द्या, लढणारे कार्यकर्ते माझ्याबरोबर आहेत, याचा मला आनंद आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले. यापूर्वी सामनाच्या अग्रलेखातून कडू यांच्यावर जोरदार टीका करण्यात आली होती. अमरावती विभागात बराच काळ आमदार व मंत्री असलेले श्रीमान बच्चू कडू यांनी स्वतःला मिंधे गटात विलीन करून जिवंत समाधी घेतली, असे टीकास्त्र अग्रलेखातून कडू यांच्यावर सोडण्यात आले.

# शिवसेना उबाठाचा वीज कंपनी विरोधात 'एल्गार'

## २५ मे रोजी विद्युत भवन समोर आंदोलन' विज मंत्री देवाची' महाआरती करून निषेध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

मागील ३ महिन्यांपासून वारंवार वीज खंडित होत असल्याने नागरिक त्रस्त झाले असून विजेच्या लपंडावाला वैतागून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने 'विज मंत्री देवा'ची महाआरती करून विज कंपनीचा निषेध करण्याचा निर्णय घेतला आहे. सोमवार, २५ मे रोजी सकाळी १० वाजता विद्युत भवन समोर हे प्रतिकात्मक आंदोलन होणार आहे. दिवसेंदिवस तासनतास वीज खंडित होण्याचे प्रकार वाढल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. वादळ-वारा नसतानाही वारंवार विद्युत पुरवठा खंडित होणे ही बाब कमी न होता सातत्याने वाढत आहे. अधिकारी मात्र विविध कारणे देऊन मोकळे होतात, असा आरोप शिवसेनेकडून करण्यात आला आहे.वीज तक्रार केंद्रात अपुरे कर्मचारी असून तक्रारी साठी फोन केल्यास वारंवार फोन न लागणे, न उचलणे, सतत व्यस्त असणे या प्रकारामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. रात्री १० नंतर लाईन गेल्यास तक्रार केंद्रच बंद असतात, अशी स्थिती आहे. विजेच्या लपंडावामुळे पाणी पुरवठा विभागाचे वेळापत्रक कोलमडले आहे. पूर्वसूचना न देता वीज जाण्याने उद्योग व व्यवसायाचे आर्थिक नुकसान होत आहे.अविरत सुरळीत सेवेसाठी अनेकदा निवेदन व तक्रारी करूनही दखल घेतली जात नसल्याने विज कंपनीच्या कारभारावर दिवसेंदिवस संतापाचा उद्रेक वाढत आहे.सुरळीत, अखंडित वीज पुरवठा व विद्युत तक्रार केंद्रातील तक्रारींची तात्काळ दखल घ्यावी, या रास्त मागणीसाठी शासनाचे व प्रशासनाचे लक्ष गांभीर्याने वेधण्यासाठी 'विज मंत्री देवा'ची महाआरती करून निषेध करण्यात येणार आहे.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे जिल्हा कार्यालयप्रमुख नितीन तारेकर यांनी या प्रतिकात्मक आरतीला विज कंपनीच्या कारभाराचा निषेध करण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिकांनी, शिवसैनिकांनी व पदाधिकाऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

# १२८ दिवस सुट्ट्या, २३७ दिवस शालेय कामकाज

## प्राथमिक शाळांच्या २६-२७ सुट्ट्यांचे नियोजन जाहीर, उन्हाळी सुट्टी २ मे ते १४ जून; १५ जूनपासून सकाळ सत्रात शाळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२ अमरावती**



जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाने सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी प्राथमिक शाळांच्या सुट्ट्यांचे नियोजन जाहीर केले आहे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सतीश मुगल यांनी काढलेल्या आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक शाळांना हे नियोजन लागू राहणार आहे. नियोजनानुसार सार्वजनिक, स्थानिक, दिवाळी, उन्हाळी तसेच विविध विशेष सुट्ट्यांचा समावेश करण्यात आला आहे. शासनाच्या अधिसूचनेनुसार २४ सार्वजनिक सुट्ट्यांपैकी महाशिवरात्री व लक्ष्मीपूजन या रविवारी आल्याने एकूण २२ दिवस सार्वजनिक सुट्ट्या राहणार आहेत. अमरावती विभागीय आयुक्तांच्या अधिकारातील रक्षाबंधन, पोळा आणि गौरी पूजन अशा तीन विशेष सुट्ट्यांनाही मंजुरी देण्यात आली आहे. - तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी यात्रा

महोत्सव, संत गाडगेबाबा पुण्यतिथी, जिल्हा परिषद व तालुका क्रीडा महोत्सव, शाळा व्यवस्थापन समितीच्या अधिकारातील सुट्टी अशा स्थानिक सुट्ट्यांचाही समावेश आहे. दिवाळी सुट्टी ६ नोव्हेंबर ते १९ नोव्हेंबर २०२६ दरम्यान राहणार असून उन्हाळी सुट्टी २ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत जाहीर करण्यात आली आहे. विदर्भातील वाढते तापमान लक्षात घेऊन शासनाच्या निर्देशानुसार ही सुट्टी निश्चित करण्यात आली असल्याचे आदेशात नमूद आहे. १५ जून ते २९ जून या कालावधीत सर्व माध्यमांच्या शाळा सकाळ सत्रात सकाळी ७ ते ११.४५ या वेळेत भरतील. त्यानंतर ३० जूनपासून नियमित वेळेत शालेय सत्र सुरू राहणार आहे. एकूण ३६५ दिवसांपैकी १२८ दिवस सुट्ट्या राहणार असून २३७ दिवस शालेय कामकाज होणार आहे. शिक्षण हक्क कायदा २००९ नुसार आवश्यक शैक्षणिक तास पूर्ण करण्याच्या दृष्टीने हे नियोजन करण्यात आले असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

# मेळघाटच्या हरिसाल वनपरीक्षेत्रात अग्नीतांडव

## परतवाडा - धारणी मार्गालगत जंगलाची राखरांगोळी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२मेळघाट**- मेळघाटातील गुगामल वन्यजीव विभागाच्या हरीसाल वनपरीक्षेत्रात गुरुवारी रात्री भीषण वनवा लागल्याने मोठ्या प्रमाणावर जंगल जळून खाक झाल्याची घटना समोर आली आहे. परतवाडा ते धारणी या मुख्य मार्गालगत असलेल्या जंगल परिसरात आग लागल्याने संपूर्ण परिसर धुराने व्यापला होता. उन्हाळ्याच्या तीव्र तापमानात लागलेल्या या आगीमुळे वनसंपदा, लहान वन्यजीव व पर्यावरणाचे मोठे नुकसान झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, मेळघाट भ्रमणावर असलेले खोज संस्थेचे संस्थापक ॲड. बंड्या साने यांनी घटनास्थळाचे व्हिडीओ व माहिती सोशल मीडियावर व्हायरल केली. संबंधित पोस्टमध्ये त्यांनी वनविभागाच्या अधिकार्यांना माहिती देऊनही घटनास्थळी अधिकारी व कर्मचारी आग विझविण्यासाठी वेळेवर पोहोचले नसल्याचा आरोप केला आहे. सोशल मीडियावर व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर स्थानिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, परतवाडा-धारणी मार्गालगत अनेक ठिकाणी जंगलात आग लागल्याचे दिसून आले. वार्याचा वेग अधिक असल्याने आग झपाट्याने पसरत गेली. त्यामुळे काही काळ वाहनचालकांनाही धुरामुळे अडचणींचा सामना करावा लागला. वनविभागाकडून आग नियंत्रणासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले जात असले तरी, वनवा नेमका कशामुळे लागला याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेमुळे मेळघाटातील जंगल सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# शकुंतला रेल्वेच्या पुनरुज्जीवनासाठी अंतिम सर्वेक्षण सुरू

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२२दर्यापूर** :



विदर्भातील ऐतिहासिक आणि पश्चिम विदर्भाची ओळख मानल्या जाणाऱ्या शकुंतला रेल्वेच्या पुनरुज्जीवनासाठी मध्य रेल्वेकडून अंतिम लोकेशन सर्वेक्षण सुरू करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणात रेल्वेमार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर, आवश्यक जमीन संपादन, स्थानकांची संख्या, प्रकल्पाचा अंदाजित खर्च तसेच भविष्यातील प्रवासी व मालवाहतूक क्षमतेचा सखोल अभ्यास केला जाणार आहे.मूर्तिजापूर-यवतमाळ-अचलपूर असा सुमारे १८८ किलोमीटर लांबीचा हा रेल्वेमार्ग देशातील एकमेव खासगी रेल्वेमार्ग म्हणून ओळखला जातो. विशेष म्हणजे, स्वातंत्र्यानंतरही या रेल्वेचे मालकी हक्क ब्रिटिश कंपनी सीपीआरसीकडे असल्याने हा विषय पुन्हा चर्चेत आला आहे. सर्वेक्षणादरम्यान सरकारी, खासगी व वनजमिनींचा अभ्यास, डोंगराळ आणि जंगल भागातील अडचणी तसेच विकासासाठी लागणाऱ्या खर्चाचा अंदाज घेतला जाणार आहे.या प्रकल्पामुळे विदर्भातील ग्रामीण भागाला मोठी रेल्वे कनेक्टिव्हिटी मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. यापूर्वी रेल्वे बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी या मार्गाची पाहणी केली होती. महाराष्ट्र शासनानेही प्रकल्पासाठी सहकार्याची भूमिका घेतल्याचे सांगितले जात आहे. मात्र, रेल्वेमार्गाच्या विकासासाठी ब्रिटिश कंपनीकडून अधिकार विकत घेण्याची आवश्यकता भासू शकते, त्यामुळे प्रकल्प खर्च वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.अंतिम सर्वेक्षणाचा अहवाल रेल्वे बोर्डाकडे सादर करण्यात येणार असून, त्यानंतर प्रकल्प मूल्यांकन समितीकडून त्याची छाननी केली जाईल. पुढे हा प्रस्ताव नीती आयोगाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणार आहे. एकेकाळी विदर्भाची शान असलेल्या शकुंतला रेल्वेच्या पुनरुज्जीवनाच्या आशा या प्रकल्पामुळे पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.-

## भूमी अभिलेख विभागाचा मोठा निर्णय;
# राज्यभर १५०० खासगी भूमापकांची नेमणूक होणार

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२२अमरावती**



प्रलंबित मोजणी अर्ज जलद गतीने मार्गी काढण्यासाठी दीडशे भूमापक नेमण्याचा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर आता राज्यभरात एकवट वेतनांवर दीड हजार खासगी भूमापक नेमण्याचा निर्णय भूमी अभिलेख विभागाने घेतला आहे. खासगी भूमापकांची नेमणूक करणे, त्यांना प्रशिक्षण देणे आणि त्यानंतर प्रत्यक्ष काम देण्यास तीन महिन्यांचा कालावधी लागणार आहे. तीन महिन्यानंतर एक महिन्यात मोजणी अर्ज निकाली काढण्याचे उद्दिष्ट विभागाने ठेवले आहे.

जमीन मोजणी प्रकरणांचा निपटारा जलद आणि पारदर्शी पद्धतीने व्हावा, यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षित परवानाधारक भूमापक आणि भूमापन एजन्सी नियुक्ती करण्याचा निर्णय यापूर्वीच राज्य सरकारने घेतला आहे. त्या अंतर्गत पुणे जिल्ह्यात एका एजन्सीमार्फत ५० भूमापकांची नेमणूक केली आहे. परंतु, पुणे शहर व जिल्ह्यातील मोजणी प्रलंबित अर्जांची संख्या विचारात घेता खासगी भूमापकांची संख्या वाढविण्याचा निर्णय भूमी अभिलेख विभागाने घेतला आहे. त्यामध्ये